# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे - ०४

## विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने भरण्यासाठी सुचना

१. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र. | नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशील |
|---|---|---|
| १ | गुरुवार दिनांक १०/०१/२०१९ (दुपारी १ वा.पासुन) ते गुरवार दिनांक ३१/०१/२०१९ (रात्री ११.५९ वा. पर्यंत) | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन / ऑफलाईन भरणे |
| २ | शुक्रवार दिनांक १८/०१/२०१९ ते मंगळवार दिनांक ०५/०२/२०१९ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र शाळेमध्ये जमा करणे. |
| ३ | सोमवार दिनांक ११/०२/२०१९ | संपर्क केंद्र शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, विहित शुल्क, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे जमा करणे. |

२. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाईन अर्ज भरावा लागल्यास त्याचा नमुदा वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याची व शुल्क भरावयाच्या चलनाची प्रिंट काढून तो विद्यार्थ्यांनी भरावा. व मुददा क्र. १ मध्ये नमूद कालावधीप्रमाणे आवश्यक ती कागदपत्रे व शुल्कासह संबंधित संपर्क केंद्र शाळेत जमा करावा.

**संकेतस्थळ http://msbos.ssc.ac.in**

( अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध्य आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.)

३. विद्यार्थ्यांसाठी नांवनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

इ. ५ वी प्राथमिक स्तर - रू. १०००/- नोंदणी शुल्क ( नियमित कालावधीसाठी)

इ. ८ वी उच्च प्राथमिक स्तर - रू. १०००/- नोंदणी शुल्क ( नियमित कालावधीसाठी)

४. विद्यार्थी खालील नमुद ३ पध्दतीनुसार नोंदणी शुल्क जमा करू शकतात.

अ) ऑनलाईन पध्दतीने - अर्ज भरल्यानंतर pay online payment लिंक उपलब्ध होईल. त्यावर Click करून Payment करता येईल.

ब) संपर्क केंद्र चलनावर नमूद शुल्क रोखीने भरावयाचे असल्यास ते संबंधित संपर्क केंद्र शाळेत जमा करावयाचे आहे. संपर्क केंद्र असलेल्या शाळांनी अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर स्वाक्षरी व शिक्का देवून ती विद्यार्थ्याकडे परत द्यावी. पावतीची दुसरी प्रत अर्जासोबत जोडून विभागीय मंडळाकडे पाठवावयाची आहे. पावतीची तिसरी प्रत संपर्क केंद्र शाळेने स्वत:कडे संग्रहीत ठेवावयाची आहे.

क) चलन - अर्ज भरल्यानंतर Challan Option निवडल्यास अर्जाबरोबर उपलब्ध करून दिलेले Challan कोणत्याही बँक खाते क्रमांकावर NEFT व्दारे वर्ग करता येईल.

५. विद्यार्थ्यांनी संपर्क केंद्र शाळेत अर्ज व शुल्क जमा केल्यानंतर संबंधित संपर्क केंद्र शाळेने त्यांच्याकडे रोखीने प्राप्त झालेले शुल्क कोणत्या बँकेत जमा करावयाचे आहे. याबाबत स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. त्यानुसार सदरचे शुल्क बँकेत भरणा केलेली पावती अ(Receipt) व सर्व अर्ज एकत्रित करून पुढील नमून्यातील यादी, मुळ अर्जासोबतची कागदपत्रे व शुल्क संबंधित विभागीय मंडळात जमा करून त्याबाबतची पोहोच घ्यावी. कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे संपूर्ण नांव | शुल्क (रूपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

६. सदरील काम करणाऱ्या संपर्क केंद्र शाळेतील मुख्याध्यापक / जेष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात येईल.

अ) मुख्याध्यापक तथा जेष्ठ शिक्षक- ( इ. ५ वी व इ. ८ वी )

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू. १५०/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू. १५०+१०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. ५००/- |

ब) लिपिक-

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू.१००/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू. १००+१०/- प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. २००/- |

७. इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी साठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नांवनोंदणी ऑनलाईन ( अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाईन ) होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केंद्राची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने विद्यार्थ्यांच्या अध्ययन विषयक व मूल्यमापन विषयक अनुषंगिक सर्व कामकाज करावयाचे आहे.

८. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर संपर्क केंद्र शाळेमार्फत विद्यार्थ्यांना परत करण्यात यावीत. सदर कागदपत्रे त्यांचे मार्फत विद्यार्थ्यांना परत मिळाल्याची खातरजमा करावी.

९. दिव्यांग विद्यार्थ्यांना या योजने अंतर्गत प्रविष्ठ व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या / प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावे.

१०. यासंदर्भातील माहिती पुस्तीका संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

१) ०२०-२५७०५१२२

२) ०२०-२५७०५११९

३) ०२०-२५७०५२०८

११. पात्र विद्यार्थ्यांना नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना संपर्क केंद्र शाळांना करून देण्यात येईल.

विभागीय सचिव, १७-०१-१९

कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.

## *प्रकटन*

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ आणि त्या अनुषंगाने प्रसिध्द करण्यात आलेल्या कृति आराखडयामध्ये मुक्त शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे. मुक्त शिक्षणाची गरज जगातील अनेक देशांनी ओळखली असून त्यांनी मुक्त शिक्षणाची कल्पना स्वीकारलेली आहे. केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था (National Institute of Open Schooling -NIOS) ही स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून १९८९ मध्ये मुक्त शिक्षणाचा पाया घातला. समाजातील प्रत्येक घटकातील मूल शिकले पाहिजे याकरिता अनेक योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. तरीही अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. तसेच काही दिव्यांग विद्यार्थी मुख्य प्रवाहातील औपचारिक शिक्षण घेण्यास असमर्थ आहेत. अतिप्रगत विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणापलिकडे अनेक विषयांचे पर्याय उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या शैक्षणिक प्रवासात राज्यातील विद्यार्थ्यांची विविध टप्प्यांवर गळती होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. यामध्ये मुलींच्या गळतीचे प्रमाणही लक्षणीय आहे. सदर वस्तुस्थितीचा साकल्याने विचार करून दिनांक १४ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाची स्थापना करण्यात आली. सदर शासन निर्णयामधील धोरणात अल्प सुधारणा करून दिनांक २१ डिसेंबर,२०१८ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

या सुधारित शासन निर्णयामध्ये मुक्त विद्यालयाची उद्दिष्टे, वैशिष्टये, प्रवेश पात्रता, विषययोजना, परीक्षा पध्दती व मूल्यमापन इ. बाबत निश्चिती करण्यात आली आहे. सद्यस्थितीत या मुक्त विद्यालय मंडळामार्फत दोन स्तरावर विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. (अ) प्राथमिक स्तर - इयत्ता ५ वी, (ब) उच्च प्राथमिक स्तर - इयत्ता ८ वी.

### (अ) प्राथमिक स्तर - इयत्ता ५ वी (सर्वसाधारण व दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता) (वय १० वर्षे पूर्ण)

१. गट-अ- भाषा विषय योजना- यामध्ये एकूण ०७ भाषा विषयांचा समावेश असून त्यापैकी कोणत्याही दोन भाषा निवडणे आवश्यक राहील.
२. गट-ब - भाषेतर विषय- सदर गटात गणित व परिसर अभ्यास हे दोन विषय असून ते दोन्ही विषय विद्यार्थ्यांना अनिवार्य आहेत.
३. गट-क - कला विषय- यामध्ये दोन विषयांपैकी कोणताही एक विषय निवडणे आवश्यक आहे.
४. याप्रमाणे विद्यार्थ्यास एकूण पाच विषय निवडणे बंधनकारक राहील.
५. दिव्यांगांकरिता विषय योजना - गट-अ मधील एकूण ०७ भाषा विषयांपैकी एक किंवा दोन भाषा विषय निवडणे आवश्यक आहे. गट-ब मधील एकूण दोन विषय व गट-क मधील एकूण तीन विषय यापैकी कोणतेही तीन किंवा चार विषय निवडणे आवश्यक राहील.
६. याप्रमाणे विद्यार्थ्यास एकूण पाच विषय निवडणे बंधनकारक राहील.

### (ब) उच्च प्राथमिक स्तर - इयत्ता ८ वी (सर्वसाधारण व दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता) (वय १३ वर्षे पूर्ण)

१. गट-अ- भाषा विषय योजना- यामध्ये एकूण ०७ भाषा विषयांचा समावेश असून त्यापैकी कोणत्याही दोन भाषा निवडणे आवश्यक राहील.
२. गट-ब मधील गणित विषय अनिवार्य आहे.
३. गट-क - एकूण ०३ विषय, गट-ड मधील दोन विषय, व NSQF विषयामधील १४ विषय या विषयांपैकी कोणतेही ०२ विषय निवडणे आवश्यक राहील.
४. याप्रमाणे विद्यार्थ्यास एकूण पाच विषय निवडणे बंधनकारक राहील.
५. दिव्यांगांकरिता विषय योजना - गट-अ मधील एकूण ०७ भाषा विषयांपैकी एक किंवा दोन भाषा विषय निवडणे आवश्यक आहे. गट-ब मधील एकूण ०४ विषय तसेच गट-क मधील कलाचे एकूण ०३ विषय व NSQF विषयामधील एकूण १४ विषयांचा समावेश आहे. गट-ब व गट-क मधील विषयांपैकी कोणतेही ०३ किंवा ०४ विषय निवडणे आवश्यक राहील.
६. याप्रमाणे विद्यार्थ्यास एकूण पाच विषय निवडणे बंधनकारक राहील.

संपर्क केंद्र :- महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामध्ये प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विभागीय स्तरावर जिल्हानिहाय व तालुकानिहाय संपर्क केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | विभागीय मंडळ | जिल्हयांची एकूण संख्या | तालुक्यांची एकूण संख्या | संपर्क केंद्रांची संख्या | अ. क्र. | विभागीय मंडळ | जिल्हयांची एकूण संख्या | तालुक्यांची एकूण संख्या | संपर्क केंद्रांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे | ०३ | ३८ | ७६ | ६ | अमरावती | ०५ | ५५ | ८० |
| २ | नागपूर | ०६ | ६५ | ६९ | ७ | नाशिक | ०४ | ३९ | ४६ |
| ३ | औरंगाबाद | ०५ | ४२ | ६६ | ८ | लातूर | ०३ | ३४ | ४५ |
| ४ | मुंबई | ०५ | ४४ | ९७ | ९ | रत्नागिरी | ०२ | १७ | १७ |
| ५ | कोल्हापूर | ०३ | ३५ | ४७ | | एकूण - | ३६ | ३६९ | ५४३ |

उपरोक्तप्रमाणे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळासाठी विभागीय स्तरावर, जिल्हानिहाय व तालुकानिहाय किमान एक याप्रमाणे एकूण ५४३ संपर्क केंद्रे निश्चित करण्यात आले आहेत. मुक्त विद्यालय मंडळासाठी विद्यार्थ्याने इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी मध्ये प्रविष्ठ होण्यासाठी प्रवेश नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्याची सुविधा वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**नोंदणी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे व पुढील कार्यवाही -**

- कागदपत्रे -
  - * शाळा सोडल्याचा दाखल्याची मुळप्रत/द्वितीयप्रत
  - * शाळेत गेला नसल्यास स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र,
  - * आधारकार्ड
  - * स्वतःचा पासपोर्ट आकारातील फ़ोटो स्वतःजवळ ठेवावा.
- ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.
- कागदपत्रे स्कॅन करण्याठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत विद्यार्थ्याचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य (Compulsory) आहे.
- संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेलवर पाठविली जाणार आहे.तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.
- विद्यार्थ्यांनी अर्ज,विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क केंद्र असलेल्या शाळा/कनिष्ट महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.
- मुक्त विद्यालयामार्फत परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज शुल्क निर्धारित करण्यात आले असून त्याची माहिती ऑनलाईन उपलब्ध आहे.
- मुक्त विद्यालयामार्फत ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीनेच नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) उपलब्ध करून देण्यात येईल.
- मुक्त विद्यालय मंडळाने निश्चित केलेल्या संपर्क केंद्रावर पात्र विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी संपर्क शिबीरांचे आयोजन करण्यात येईल.
- संबंधित पात्र विद्यार्थ्यांना मुक्त विद्यालय मंडळाने तयार केलेल्या स्वयंअध्ययन पुस्तिका संपर्क केंद्रावर उपलब्ध करून देण्यात येतील.
- नावनोंदणी केलेल्या पात्र विद्यार्थ्याने संपर्क शिबीरामध्ये उपस्थित राहून त्याने निवडलेल्या विषयनिहाय स्वयंअध्ययन पुस्तिका सोडविणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याने सोडविलेल्या स्वयंअध्ययन पुस्तिकांचे मूल्यमापन संपर्क केंद्रावरील संबंधित तज्ज्ञ शिक्षकांमार्फत तपासून व त्यावर आवश्यक ते मार्गदर्शन व सूचना नमूद करतील.
- मुक्त विद्यालय मंडळामार्फत इयत्ता ५ वी व ८ वी च्या परीक्षेस विद्यार्थ्यांचे मूल्यमापन निर्धारित केलेल्या तरतूदीनुसार करण्यात येईल.

क्र.कोविमं / शाखा १० वी परीक्षा/मुक्त विद्यालय/ 2755
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक :- १४.०१.२०१९

प्रति,
सर्व मान्यताप्राप्त मुक्त विद्यालय संपर्क केंद्र ,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

मुक्त विद्यालय मंडळाच्या प्राथमिक स्तर ( इ. ५ वी) व उच्च प्राथमिक स्तर ( इ. ८ वी) साठी प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन नावनोंदणी अर्जाबाबत जा.क्र.रा.मं/संशोधन /मुक्त विद्यालय/१४२ दि. ०९/०१/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे सर्व केंद्र प्रमुखांनी नोंद घेऊन कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.